# पर्यटन संचालनालय (DoT),महाराष्ट्र शासन

मुख्यालय :साखर भवन, ४था मजला प्लॉट नं. २३०, नरीमन पॉईंट, मुंबई.४०००२१-
दूरध्वनी क्र.९१- २२-६९१०७६००,
ई-मेल – diot@maharashtratourism.gov.in
वेबसाईट – www.maharashtratourism.gov.in

क्रपसं./विकास/अमृत महोत्सव/१/प्र.क्र.८/२०२५/ २२६४
दिनांक : 22 JUL 2025

प्रति,
अग्रणी बँक व्यवस्थापक
सर्व जिल्हे (३६ जिल्हे)

**विषय : "आई" महिला केंद्रित पर्यटन धोरणाअंतर्गत महिलांना व्यावसायिक कर्ज उपलब्ध करून देणे बाबत.**

संदर्भ : शासन निर्णय क्र. टिडीएस २०२२/१२/प्र.क्र.७५०/पर्यटन, दि.१९/०६/२०२३.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये महिलांचा पर्यटन क्षेत्रात सहभाग वाढविणे, त्यांच्यामध्ये उद्योजकता आणि नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी "आई" महिला केंद्रित / लिंग समावेशक पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणानुसार महिलांनी पर्यटन क्षेत्राशी निगडीत व्यवसाय करण्यासाठी मान्यताप्राप्त बँकेमार्फत रु. १५ लक्ष च्या मर्यादेत कर्ज घेतल्यास त्या कर्जावरील व्याजाचा परतावा १२% च्या प्रमाणात किंवा कर्ज कालावधी ७ वर्षे किंवा रक्कम रु. ४.५ लक्ष यापैकी जे कमी असेल ते पर्यटन संचालनालयामार्फत व्याज परतावा स्वरुपात संबंधित महिला लाभार्थी यांना अदा करण्यात येईल.

"आई" महिला केंद्रित पर्यटन धोरणाअंतर्गत सद्यस्थितीत ९५८ महिलांना योजनेचे पात्रता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहे. २७२ महिलांना विविध बँकांमार्फत एकूण ३३.२७ कोटी इतके व्यावसायिक कर्ज मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी खालील नमूद बँकांमार्फत सदर योजने अंतर्गत महिला व्यावसायिकांना १२% पेक्षा कमी व्याजदराने कर्ज मंजूर करण्यात आले आहे. मंजूर झालेल्या कर्ज रक्कम व व्याजदराचे विवरण पुढीलप्रमाणे;

| अनु. क्र. | बँकेचे नाव | कर्ज प्रकरणांची संख्या | व्याजदर | कर्जाची रक्कम (रु. लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | ८ | ११.५०% | ८६.६० |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडिया | ३० | ११.४०% | ४६७.५७ |
| ३ | बँक ऑफ इंडिया | ५ | ११.३५% | ७५.०० |
| ४ | बँक ऑफ महाराष्ट्र | २५ | ११.८०% | २६९.७१ |
| ५ | बँक ऑफ बडोदा | ४ | ११.७५% | ३९.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | इंडियन ओव्हरसीज बँक | ३ | ११.०१% | ३४.२५ |
| ७ | YES बँक | ९ | ११.२०% | १८२.४१ |
| ८ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया | १ | ९.७५% | १०.०० |

उपरोक्त नमूद बँकांमार्फत एकूण ८५ महिलांना एकूण रुपये ११.६५ कोटी इतके व्यावसायिक कर्ज १२% पेक्षा कमी व्याजदराने वितरीत करण्यात आले आहे. त्यासाठी सर्व बँकांचे पर्यटन विभागामार्फत विशेष अभिनंदन!!!

भविष्यामध्ये "आई" महिला केंद्रित पर्यटन धोरणाअंतर्गत जास्तीत जास्त महिलांना व्यावसायिक कर्ज उपलब्ध करून योजना अधिक सक्षम करण्यामध्ये योगदान द्यावे ही अपेक्षा व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!!!

**(डॉ. बी.एन.पाटील भा.प्र.से.)**
**संचालक**
**पर्यटन संचालनालय,मुंबई.**